

वाचन पातळी २

# बाबाच्या मिश्या

Author: Madhuri Purandare

Illustrator: Madhuri Purandare



तशा अनूला बाबाच्या खूप गोष्टी आवडतात. बाबानं केलेला आकाशकंदील, त्यानं तळलेली कांद्याची भजी, त्यानं केलेलं कागदाचं कासव...

शिवाय तो उड्या मारत जिने चढतो, मामाबरोबर कुस्ती खेळतो, पाहुणे आले की सगळ्यांना खूप हसवतो, ते सगळंच अनूला आवडतं.

पण तिला सगळ्यात जास्त काय आवडतं?

बाबाच्या मिश्या.



रोज सकाळी बाबा दाढी करतो. अनू शेजारी बसते आणि मन लावून बघते. आपली छोटीशी कात्री दोन बोटांमध्ये पकडून चुक् चुक् आवाज करत बाबा आपली मिशी कातरतो.

अनू म्हणते, “आता इकडे थोडंसं....!

आता थोडंस्सं त्या बाजूला...

आं! बाबा, छोटी नाही करायची मिशी! कट्टी करीन मग!” बाबा अंघोळ करून येतो.



अनू छोटुशा कंगव्यानं त्याच्या मिश्या नीट विंचरते.
मग त्यांची दोन्ही टोकं बोटांच्या चिमटीत पकडून वळवते.
बाबाच्या मिश्या मस्त आकडेबाज होतात.
“हं, झालं. आता विस्कटायच्या नाहीत हं त्या, सांगून ठेवतेय,” अनू बाबाला बजावते.



अनूला नेहमी वाटतं, की बाबानं झकास अंगरखा घातला,

डोक्यावर लालचुटुक पगडी घातली आणि तो घोड्यावर बसला, तर कसला दिसेल!

कमरेला तलवारबलिवार...

एकदम मावळाच!

चष्मिस मावळा!



अनूला खरं म्हणजे मिश्यावाली सगळीच माणसं आवडतात.

वर्गातल्या तुतीच्या, म्हणजे स्मृतीच्या बाबाच्या मिश्या केवढ्या जाड आहेत!

त्या विंचरायला भलामोठ्ठा कंगवा लागत असेल.

तुतीचा बाबा टेनिस मस्त खेळतो.

खरं म्हणजे त्यानं कुस्ती खेळायला पाहिजे.

असा तुरेदार फेटा डोक्याला बांधला आणि खांद्यावर गदा घेतली, तर तो कसला भारी दिसेल!



साहलिच्या बाबाच्या मशि्या अगदी बारीक आहेत.
त्या इतक्या छान कातरणं कसं काय जमतं त्याला, कोण जाणे.
त्यानं मोठ्ठी काळी हॅट घातली, मोठ्ठा काळा कोट चढवला आणि काळा चष्मा घातला, तर तो टीव्हीवरच्या मालकितला गुप्तपोलसि असतो नं, वाईट चोराला पकडून देणारा, त्याच्यासारखा दसिल.



शेजारच्या घरात राहणाऱ्या आजोबांची मिशी सगळ्यांत बेश्ट आहे.
आकाशातला चमुकला काळापांढरा ढग त्यांच्या नाकाखाली राहायला आलाय असं वाटतं.
त्या ढगामागे त्यांचं तोंड लपून जातं.
त्यांना खाता कसं येत असेल?
अनूला आजोबांची काळजीच वाटते.



अनूला प्रश्न पडतो, माझ्या नाकाखाली का मिश्या उगवत नाहीत?
मग ती रोज अंघोळीआधी हातावर साबणाचा चिक्कार फेस करते आणि नाकाखाली तऱ्हेतऱ्हेच्या मिश्या चिकटवते.

“माझी मिशी सगळ्यांपेक्षा मस्त आहे. पांढरीशुभ्र, मऊ मऊ....
आहे की नाही छान?” ती खूष होऊन म्हणते.

This book was made possible by Pratham Books' StoryWeaver platform. Content under Creative Commons licenses can be downloaded, translated and can even be used to create new stories - provided you give appropriate credit, and indicate if changes were made. To know more about this, and the full terms of use and attribution, please visit the following link .

Story Attribution:

This story: बाबाच्या मिश्या is written by Madhuri Purandare . © Pratham Books , 2012. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license.

Other Credits:

This book has been published on StoryWeaver by Pratham Books. Pratham Books is a not-for-profit organization that publishes books in multiple Indian languages to promote reading among children. www.prathambooks.org

Illustration Attributions:

Cover page: Man trimming his moustache and little girl watching , by Madhuri Purandare © Pratham Books, 2011. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license.

Page 2: Little girl looking at man , by Madhuri Purandare ©

Pratham Books, 2011. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 3: Man trimming his moustache and girl watching curiously , by Madhuri Purandare © Pratham Books, 2011. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 4: Little girl playing with man's moustache , by Madhuri Purandare © Pratham Books, 2011. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 5: Soldier riding a horse and girl watching , by Madhuri Purandare © Pratham Books, 2011. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 6: Man playing tennis , by Madhuri Purandare © Pratham Books, 2011. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 7: Man with hat and overcoat at night , by Madhuri Purandare © Pratham Books, 2011. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 8: Old man gardening , by Madhuri Purandare © Pratham Books, 2011. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 9: Girl lathering her face , by Madhuri Purandare © Pratham Books, 2011. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Disclaimer: https://www.storyweaver.org.in/terms_and_conditions

Some rights reserved. This book is CC--BY--4.0 licensed. You can copy, modify, distribute and perform the work, even for commercial purposes, all without asking permission. For full terms of use and attribution, http://creativecommons.org/licenses/by/4.0/

बाबाच्या मिश्या (Marathi)

अनूला बाबाचं सगळ्यात जास्त काय आवडतं, तर त्याच्या मिश्या. खरं म्हणजे तिला मिश्यावाली सगळीच माणसं आवडतात. मिश्या बघितल्या की तिला काय काय भन्नाट कल्पना सुचतात.

या पुस्तकाची वाचन पातळी २ आहे. ओळखीचे शब्द जाणून वाचणाऱ्या आणि मदत घेऊन नवे शब्द वाचू शकणाऱ्या मुलांसाठी.

PRATHAM BOOKS storyweaver

Pratham Books goes digital to weave a whole new chapter in the realm of multilingual children's stories. Knitting together children, authors, illustrators and publishers. Folding in teachers, and translators. To create a rich fabric of openly licensed multilingual stories for the children of India -- and the world. Our unique online platform, StoryWeaver, is a playground where children, parents, teachers and librarians can get creative. Come, start weaving today, and help us get a book in every child's hand!